-: प्रेस नोट :-

कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई / चालक पोलीस शिपाई भरती-२०२२-२३ साठी आवेदन अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, दिनांक १९.०६.२०२४ ते दिनांक २३.०६.२०२४ या कालावधीत पोलीस शिपाई पदाची व दिनांक २४.०६.२०२४ ते २७.०६.२०२४ या कालावधीत पोलीस शिपाई चालक पदाची शारिरीक व मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. तथापि काही उमेदवारांनी विविध पदांकरिता एका घटकात किंवा वेगवेगळया घटकात अर्ज केले असल्याने उमेदवारांना एकाच दिवशी किंवा लागोपाठचे दिवशी दोन पदांकरिता मैदानी चाचणीसाठी हजर राहण्यास अडचण निर्माण होवू नये याकरीता सदर उमेदवारांना त्यांच्या निश्चित केलेल्या मैदानी चाचणीच्या दिनांका व्यतिरिक्त इतर दिनांकास हजर राहण्याची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे.

या घटकाकडे आवेदन अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांना शेवटची संधी मिळावी यासाठी मागील कालावधीत दुस-या घटकात मैदानी चाचणी असलेल्या अथवा तांत्रिक कारणांमुळे प्रवेशपत्र उपलब्ध न झालेल्या पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई पदासाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना दि.२८.०६.२०२४ रोजी शारिरीक व मैदानी चाचणीची अंतीम संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी संबधीत उमेदवार यांनी शुक्रवार दिनांक २८.०६.२०२४ रोजी सकाळी ०५.०० वाजता पोलीस परेड मैदान, कसबा बावडा, कोल्हापूर या ठिकाणी उपस्थित राहावे.

(महेंद्र के.पंडित,भा.पो.से)
पोलीस अधीक्षक,कोल्हापूर